| | |
|---|---|
| MHSN110005482025 | नियमित दिवाणी दावा क्र.१२४/२०२५<br>संभाजी पवार/आप्पासो पवार |

**निशाणी ९ खालील आदेश**

१. प्रतिवादी नं १ ते ४ यांचे म्हणणे की, प्रतिवादी विरुध्द ''विना कैफियत व विना म्हणणे'' चा हुकूम झाला असून प्रतिवादी नं. १ ते ४ हे ग्रामीण भागातील अशिक्षीत शेतकरी असून त्यांना मुदतीत आवश्यक ती कागदपत्रे व माहिती घेवून व जरूर त्या कागदपत्रांची पूर्तता न करता आल्यामुळे प्रतिवादींना वादीच्या दाव्यास कैफियत व म्हणणे मुदतीत देता आले नाही. प्रतिवादी हे जाणूनबुजून गैरहजर राहिलेले नव्हते अथवा त्यांनी जाणूनबुजून कैफियत व म्हणणे देणेस उशीर केलेला नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द ''विना कैफियत व विना म्हणणे'' चा आदेश न्यायाच्या दृष्टीने सेट असाईड होवून मिळणे अत्यंत आवश्यक आहे. ''विना कैफियत व विना म्हणणे'' चा आदेश रद्द न झालेस या प्रतिवादीच्या कायदेशीर न्याय व हक्कांवर गदा निर्माण होवून या प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. याउलट वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करुन सदरचे काम गुणदोषावर चालून न्यायदान करणेस मदतच होणार नाही.

२. वादीतर्फे प्रतिवादीचे निशाणी ८ चे अर्जास म्हणणे आहे की, प्रतिवादीचा अर्ज व त्यातील संपुर्ण मजकूर धादांत खोटा व लबाडीचा असल्यास तो यातील वादीने मान्य व कबूल केलेले नाही. प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. प्रतिवादींनी वादीना त्रास देणेचे उद्देशाने सदरचा दावा प्रोलॉग करणेचे हेतुने प्रतिवादींनी कैफियत दाखल केले नाही. याही कारणास्तव प्रतिवादीचे अर्ज मंजूर करणेची निर्णयापर्यंत आलेस

जास्तीत जास्त कॉस्ट करणेत यावी असे वादीचे विनंती आहे.

३. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा वाटप व कब्जासाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०५/०२/२०२६ रोजी दाखल केलेला आहे. त्यांनी ३० दिवसात आणि तद्नंतर जास्तीत जास्त ९० दिवसामध्ये कैफियत सादर करणे गरजेचे होते. परंतु मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या न्यायनिवाड्यामध्ये सदर ९० दिवसांचा कालावधी हा निर्देशक स्वरुपाचा असल्यामुळे पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्यासाठी नैसर्गिक न्यायतत्वानुसार त्यांना संधी देणे गरजेचे असल्याबाबत नमूद केले आहे. त्यामुळे, अर्ज मंजूर न केल्यास विनाकारण गुंतागुंत होवून प्रकरणांची संख्या वाढणार आहे. सबब, प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडायला देणे या दाव्याच्या सुनावणीकरीता गरजेचे असल्यामुळे त्यांच्याविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्दबातल करणे मला न्यायोचित वाटते. परंतु प्रतिवादी यांनी केलेल्या विलंबाबाबत त्यांचेवर कॉस्ट आकारणे उचीत होणार आहे. त्यामुळे, मी खालील आदेश पारीत करते.

## आदेश

१. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा अर्ज वादी यांना र.रु.२००/– (अक्षरी दोनशे रुपये मात्र) देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. कॉस्टची रक्कम भरल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्दबातल करुन त्यांनी दिलेली कैफियत सदर कामी वाचण्यात येईल.

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2026.04.16 18:32:20 +0530

**आटपाडी.** **(अ. जो. बाचुळकर)**

**दिनांक : १६/०४/२०२६** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**

**आटपाडी**

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Pramod Shashikant Salunkhe(Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi |
| Date | : | 16/04/2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 16/04/2026 |
| Order uploaded on | : | 16/04/2026 |